# भारतातील शेतकरी आंदोलनाची दिशा

**प्रा. डॉ. आर.डी. मांडणीकर,** राज्यशास्त्र विभागप्रमुख, श्री.शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर.

---

**प्रस्तावना :**

भारत हा कृषिप्रधान देश आहे. देशाच्या एकूण लोकसंख्येत शेतीवर उपजिविका करणाऱ्या लोकांची संख्या इतर कोणत्याही व्यवसायातील लोकांच्या संख्येपेक्षा अधिक आहे. भारतातील 64% जनता कृषिक्षेत्रावर अवलंबून आहे आणि त्यातील 70% शेतकरी अल्पसुधारक आहेत. स्वातंत्र्या पूर्वी ब्रिटीशाची सत्ता असल्याने शेतकऱ्याच्या दुरावस्थेला ब्रिटीश शासन जबाबदार आहे असे आपण मानतो. भारताला स्वातंत्र्य मिळून आज 74 वर्षे झाली आहेत. तरी शेती व शेतकऱ्यांचे प्रश्न सुटलेले नाहीत. आपल्या न्यायपूर्ण मागण्या मान्य होत नाही. त्याचा साधा विचारही होत नाही. शेतीमाला सयोग्य भाव मिळत नाही याची जाणिव प्रक्रर्षाने शेतकरी वर्गाला जाणवत आहे. यातून आपण शेतकरी आंदोलन करताना आपणाला पहायला मिळतो. भारताच्या विकास घटकाचा विचार केला तर शेती हा घटक अगदी खालच्या स्तरावरती आहे. भारतातील शेतीक्षेत्राचा मनावातसा विकास झालेला नाही. यामुळे शेतकरी वर्गात मोठया प्रमाणात चीड निर्माण झाली आहे. त्यातूनच त्याच्या मनात विलगतेची भावना निर्माण झालेली दिसते. आलीकडे शेतकऱ्याच्या आत्महत्तेचे प्रमाण वाढत आहे. एका शेतकऱ्याला आत्महत्या करावी लागते हे भारताचे दुर्दैव आहे असेच मनावे लागेल.

भारतातील शेतकरी आंदोलन याविषयी चर्चा करताना त्याचे दोन कालखंडात अभ्यास करावे लागेल. एक म्हणजे भारताच्या स्वातंत्र्यापूर्वीचा काळातील शेतकरी आंदोलन आणि दुसरे म्हणजे स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडातील शेतकरी आंदोलनयांचा आढावा घ्यावा लागतो. मग भारतातील समकालीन शेतकरी आंदोलनयाची दिशा व कार्यप्रणाली याचा अभ्यास करण्यात येतो. स्वातंत्र्यपूर्वी कालखंडात ब्रिटीश सरकारच्या शेती विषयक धोरणामुळे शेतकऱ्यावर परिणाम झाला आणि शेतकऱ्यानी आंदोलनाचे हत्यार उपसलेले दिसतात.

**अभ्यासाची उदिदष्टये :-**

1. स्वातंत्र्यापूर्वी कालखंडातील शेतकरी आंदोलनाचा अभ्यास करणे.
2. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील शेतकरी आंदोलनाचा अभ्यास करणे.
3. समकालीन संदर्भातील शेतकरी आंदोलनाचा अभ्यास करणे.
4. शेतकरी आंदोलनाची प्रस्तुतता पाहणे.
5. सारांश व निष्कर्ष मांडणे.

ब्रिटीश राजवटीतच देशात शेतकरी विरोधी धोरण राबवण्याची प्रथा आपणाला पहायला मिळते. ईस्ट इंडिया कंपनीनेच आपले उत्पादन वाढवण्यासाठी महसूल विषयक कायद्यात बदल केला. या बदलाचा परिणाम भारतातील तथाप शेतकरी वर्गावर झाला.

सरकारने शेतकऱ्याकडून किती प्रमाणात शेतसारा गोळा करावायाचे कोणतेही निर्बंध नव्हते. भारतात अनेक पक्षाचे सरकार स्थापन झाले मात्र या सरकारची ब्रिटीश सरकारच्या पावलावर पाऊल ठेवतच शेतकऱ्याविषयी धोरण ठरविले आहे. शेतकरी आंदोलनाचा परिणाम आपल्या सरकारवर पडू शकतो याची जाणिव सरकारना होताना दिसते.

स्वातंत्र्यापूर्वी कालखंडातील भारतातील शेतकरी आंदोलन मुंबई आणि मद्रास प्रांतात ब्रिटीशांनी रयतवारी पध्दती सुरू केली. शेतकऱ्याला त्यांच्या जमीनीचा मालकी हक्क देण्यात आला. शेतकऱ्याने शेतसारा मध्यस्थीच्या माध्यमातून न भरत सरळ सरकारकडे भरावा अशी पध्दत निर्माण केली. जो शेतकरी नियमित शेतसारा भरेल तोपर्यंतच त्याची जमीनीवर मालकी हक्क राहील. अशा पध्दतीचे धोरण राबविले. काही शेतकऱ्याला शेतसारा भरण्यासाठी खाजगी लोकाकडून पैसा घ्यावा लागत असे यातून खाजगी सावकारी पध्दत निर्माण झाली. या सावकारी वर्गाने मोठया प्रमाणात जमीनी बळकावल्या.

1857 ते 1921 हा कालखंड शेतकरी आंदोलनाचा शुभारंभ आहे असेच म्हणावे लागेल. खाजगी सावकारी ब्रिटीशाची जुलमी शेतसारा यामुळे शेतकरी कचाटयात सापडला. शेतकऱ्यावरील अन्याय इतका प्रचंड प्रमाणात होता की शेतकरी स्वत: त्या विरोधात आवाज उठवला परंतू हा शेतकऱ्याचा आवाज संघटित स्वरूपाचा नव्हता. 1855 मध्ये संस्थानिकांनी सावकाराविरोधात केलेला उठाव, 1857 मध्ये दक्षिणेत झालेली सावकाराविरोधात दंगल याकाळातच बंगालमध्ये कुळानी जमीनदारा विरोधात फुकलेले रणसिंग पंजाब आणि दिल्ली, मध्यप्रदेश या राज्यातील शेतकऱ्यांनी सावकाराविरोधात उभे केलेले बंडया वरून असे दिसून येते की, भारतात 19 व्या शतकापासूनच शेतकऱ्यामध्ये असंतोष निर्माण झालेला आहे. वरील आंदोलनाचे स्वरूप असंघटीत होते असे आपणांला म्हणता येईल. शेतकरी वर्गाकडून कधी ब्रिटीश राजवटी विरूध्द तर कधी राजेराजवाडयांनी, जमीनदारा विरूध्द बंड केले होते. याकाळातील उठावाचे उदिदष्ट म्हणजे ब्रिटीशाची हकालपटटी करणे आणि पूर्वीचे सरकार आणणे हे होते. या उठावात खूप मोठया प्रमाणात शेतकरी सामील झाला होता.

1765 ते 1857 या दरम्यान पूनस्थापनावादी प्रकारचे शेतकऱ्याचे अनेक उठाव झाले आहेत. यामधील हिंदू, मुसलमान जमीनदार विरूध्द राजा चैतासिंग यांच्यात 1778 ते 1781 या साली उठाव झाला. 1801 ते 1805 या दरम्यान उत्तर कर्नाटकच्या तिनवेली भागातील पाळेवार व त्यांच्या शेतकऱ्यामधील प्रचंड उठाव झाला. त्यानंतर जावणकोर व कोचीन मधील 30,000 सैनिकासह केलेला सशस्त्र उठाव यात शेतकरी मोठया प्रमाणात सहभागी झाले होते आणि हे उठाव ब्रिटीशांनी चिरडून टाकले होते. 1857 च्या उठावाचा प्रतिकात्मक झालेला नसला तरी त्याची व्याप्ती जवळ-जवळ उत्तर व मध्य भारतात पसरलेली होती. भारतात काही सामुहीक प्रकारचे उठाव झाले. त्याचे स्वरूप आकस्मिक व नाटयपूर्ण होते. हे उठाव बहुतांशी शांततापूर्ण सामुहिक बहिस्काराच्या स्वरूपाचे होते मात्र

आत्याचाराच्या मार्गाने त्यांना दडपणाचा प्रयत्न झाल्यावर प्रत्युतर म्हणून सशस्त्र प्रतिकारही झाल्याचे दिसते.

एका बाजूला सरकार आणि दुसऱ्या बाजूला सावकार या दोन्हींच्या कचाटयात शेतकरी सापडला होता. या प्रश्नावर सुरूवातीला महाराष्ट्रातील शेतकऱ्यानी शांततामय मार्गाने आपले गऱ्हाने सरकारकडे मागण्याचा प्रयत्न केला. पण शेतकऱ्याला असंतोष सरकारनी लक्षात घेतलाच नाही. परीणाम अशा झाला की शेतकऱ्याचा जास्तच चीड निर्माण झाली आणि मग शेतकऱ्यांनी विविध ठिकाणी नगर, सोलापूर, पूणे इत्यादी ठिकाणी सावकारा विरूध्द आंदोलन पुकारले. सावकारा विरूध्द सामाजिक बहिस्कार सुरू केला व लवकरच हे आंदोलन हिंसक बनले. चंपारण्य शेतकऱ्याचा लढा, सोडास त्यागृह मोपल्याने बंड, तेलंगणातील शेतकरी आंदोलन आणि साताऱ्याचे बंड इत्यादी शेतकरी आंदोलने पहता येतात.

**स्वातंत्रयोत्तर कालखंडातील भारतातील शेतकरी आंदोलन :**

भारतातील शेतकऱ्यांना आपले सरकार आहे म्हटल्यावर शेतीविषयक सुधारणा होणार होतील असे वाटले. ग्रामीण भागातील शेतकऱ्याच्या जरा आकांक्षा उंचावलेल्या होत्या. एवढे दिवस ज्या समस्या, प्रश्न सोडवण्यासाठी ब्रिटीश सरकार विरूध्द लढा दिला त्या समस्या आता स्विकीय सरकार सोडवेल अशी आशावाद निर्माण झाला परंतू शेतकरी आंदोलनातील अनेक नेते सरकारमध्ये व सत्ताधारी पक्षात गेले व ही चळवळ काहीशी प्रमाणात थंडावलेली दिसते. 1946 मधील तेआग्रा चळवळ, 1948 मध्ये केरळमधील धान्य वाहून नेणाऱ्या टॅक्सवरील हल्ला. 1966-71 च्या काळात आंध्रमध्ये जमीनीच्या हक्कासंबंधी व पीक वाटयासंबंधी, 1969-70 मध्ये श्रीकाकुलममुशाहरी वदेवरागोपीवल्लभपूर येथे सावकार-पोलीसामधील उठाव इतयादी उठावाचा आढावा घेता येईल.

भारतातील शेतकरी आंदोलनाच्या उंबरठयावर उभा राहण म्हणजे भारताच्या विकासाचे चक्र मंदावले आहे की काय असा दृष्टीकोन होय. भारतातील शेतकऱ्याचे प्रश्न, समस्या वेळीच सोडवल्या पाहिजेत. शेतकरी जर सुखी नसेल तर भारतातील अनेक घटक उपाशी राहण्याची वेळ येईल. त्या करता सरकारने शेतकऱ्याच्या प्रश्नाकडे गांभिर्यपूर्वक विचार करून त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचार थांबला पाहिजे यावर तोडगा काढणे गरजेचे आहे.

भारतातील शेतकऱ्याच्या प्रश्नावरती शेतकरी कामगार पक्ष, मार्क्सवादी कम्युनिष्ट पार्टी, भारतीय किसान संघ व शेतकरी संघटना यांच्याकडून आवाज उठवला. त्यामध्ये शेतकरी कामगार पक्षाचे भाई उध्दवराव पाटील, श्री. आण्णासाहेब गव्हाणे यांनी शेतकऱ्याच्या प्रश्नावरील व्यापक प्रमाणात लढा उभा केला. भारताला स्वातंत्र्य मिळून 74 वर्षे पूर्ण झाले आहेत. तरी आजही शेतकरी सुखी व समाधानी दिसत नाही. शेतकऱ्याची पूर्वीची स्थीती ज्यापध्दतीची होती त्यामध्ये सुधारणा होणे अपेक्षित असताना ती वरचेवर बीघडत चाललेली आहे. शेतकऱ्याच्या प्रश्नावर ती कॉ. गंगाधर आप्पा बुरांडे कॉ. विठ्ठल

नाईक या नेत्यानी किसान सभेच्या माध्यमातून व्यापक असे जन आंदोलन उभे केले. महाराष्ट्रात शरद जोशीच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्याचे विराट असे जनआंदोलन उभे केले.

1978 ते 1983 च्या कालखंडात शेतकऱ्याचे आंदोलने अनेक झालेली आहेत. या आंदोलनात 21 शेतकऱ्याचा बळी गेलेला आहे. 1973 पासून देशाच्या विविध भागात गुजरात, तमीळनाडू, मध्यप्रदेश, कर्नाटक, पंजाब इत्यादी राज्यात शेतकऱ्याची मोठया प्रमाणात आंदोलने सुरू झाले होते. भारतातील शेतकरी आमच्या मालाला योग्य भाव व रास्त भाव मिळावा हे उदिदष्ट पायाभूत तत्व मानून शेतकऱ्यांनी आंदोलन केले. 1982 पूर्वी भारतातील शेतकरी संघटनेचे आंदोलन हे असंघटनात्मक स्वरूपाचे बनले होते. एक दुध आंदोलन शेतकरी संघटनेला माघार घ्यावी लागली. दुध आंदोलनात शेतकरी संघटनेला माघार घ्यावी लागली. दुध आंदोलनातून माघार घेतल्यामुळे शेतकऱ्याला फटका बसला आणि शेतकऱ्याने आपल्या शेतकरी संघटनेकडे संघटनात्मक बांधणीकडे लक्ष घातले. सत्तेशी संघर्ष आपल्या मागण्या मंजूर करून घेणे किंवा सत्तेच्या राजकारणापासून अलिप्त राहून शेतकऱ्याचे प्रश्न सोडवणे याविषयी शेतकरी संघटनेतील सदस्यापुढे पर्याय उभा राहिला. काही शेतकऱ्यांनी राजकारणात भाग घेतले तर काही सदस्यांनी राजकारणापासून दोन हात लांबच राहण्याचा सलला घेतला.

नाशिक, लासलगाव, पुणे, चाकण, लोनंद या ठिकाणी कांदा उत्पादकाने आंदोलन केले. शेतकरी संघटनेतील नेत्यानी अमरण उपोषण केले. पुणे, नाशिक मार्गावरील रास्तारोको आंदोलन केले. हिंसक वळण लावून वाहतूक विस्कळीत केली. महाराष्ट्रात ऊसउत्पादकाचे आंदोलन, तंबाखू उत्पादकाचे आंदोलन, दुध उत्पादकाचे शेतकऱ्याचे आंदोलन, कापूस उत्पादक शेतकऱ्याचे आंदोलन इत्यादी आंदोलने झाली आहेत.

**समकालिन संदर्भातील शेतकरी आंदोलन :**

केंद्र सरकारने कृषीसंदर्भात जे नवीन तीन कायदे केले होते त्याविरोधात शेतकऱ्यांनी आंदोलन केले आहे. हे कायदे शेतकऱ्याचे हिताचे आहेत असे सरकार सांगत होते. या शेतकऱ्याच्या कायद्याबाबत काही अर्थतज्ञांनीही हे कायदे शेतकऱ्याचा फायदा होणारे आहेत अशी ओळख करून देण्याचा प्रयत्न असफल ठरला म्हणावा लागेल. परंतू बहुसंख्य शेतकरी संघटनाचा यास विरोध होता हे कायदे बडया भांडवलदारांना शेतीव्यवसायात शिरकाव करणे सोपे व्हावे यासाठी कायदे आहेत. कोरोणा विषाणूने जगात हाहाकार माजवला असताना संसदेत कोणतीही चर्चा न करता जून 2020 मध्ये सरकारने खालील तीन कायदे मंजूर केले

1. शेतमाल किंमत व शेती सेवा कायदा.
2. शेतकरी उत्पादने व्यापार व वाणिज्य.
3. अत्यावश्यक साठा.

हे तीन्ही कायदे मुख्यत: शेतमाल, किमती शेतमाल व्यापार, वाणिज्य, याबाबत आहेत. पंजाब, हरीयाणा, तामीळनाडू, आंध्रप्रदेश ही शेतीविकासात आघाडीवर आहेत. सरकारी योजनाचा फायदा या राज्यातील शेतकऱ्याना झाला. भारतात बहुसंख्य जास्त

86% शेतकऱ्याची जाणिव 5 एकर पेक्षा कमी आहे. सिंचनाच्या सोई नसल्याने केवळ पावसळयात पीके घेतली जातात. शेतकरी व्यवसायात दोन जोखीम असतात एक नैसर्गिक व दुसरी बाजार जोखीम या कायद्यामुळे दुसऱ्या जोखीम शेतकऱ्याच्या नशीबी येईल यासाठी शेतकऱ्याकडून विरोध आहे. या तीन शेतकरी कायद्याच्या विरोधात भूतोत्नभविष्य 372 दिवस भारतातील शेतकऱ्यांनी आंदोलन केले आहे. यामध्ये प्रामुख्याने पंजाब, हरीयाणा, दिल्ली येथील शेतकऱ्याचा प्रचंड प्रमाणात पाठींबा होता. या तीन कायद्याच्या विरोधात शेतकरी आंदोलन हानून पाडण्यासाठी सरकारच्या माध्यमातून अनेक स्तरावरील प्रयत्न करण्यात आले. या आंदोलनात अनेक शेतकऱ्याला आपला जीव गमवावा लागला आहे. उत्तरप्रदेश मधील शेतकरी आंदोलन स्थळी त्यांच्या अंगावर गाडी घालून आंदोलन मोडीत काढण्याचा प्रयत्न सरकारकडून झालेला दिसून येतो. सरकारच्या अनेक कार्याला न घाबरता शेतकऱ्यांची आक्रमक आंदोलनाला पाठींबा चालूच ठेवला.

शेवटी सरकारलाच या तिन्ही कायदे मागे घ्यावे लागले हे कायदे जोपर्यंत सरकार मागे घेणार नाहीत तोपर्यंत शेतकरी आंदोलन चालूच राहणार अशीच मानसिकता या आंदोलनाची होती.

**शेतकरी आंदोलनाची प्रस्तुतता :**

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडातील झालेले शेतकरी आंदोलने याची दिशा स्पष्ट होती. काही सुरूवातीच्या काळातील आंदोलने हे असंघटीत स्वरूपाचे वाटतात. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या शेतकरी आंदोलनामध्ये संघटनात्मक स्वरूपाची बांधणी दिसून येते. भारतातील शेतकरी आंदोलनाचे नेतृत्व करणारे नेते राजकारणात उतरत आहेत व मुळ शेतकऱ्याचा प्रश्न हाताळत नाहीत. आताच्या शेतकरी आंदोलनाची दिशा स्पष्ट दिसून येत नाही. शेतकरी आंदोलन हे वैचारीक स्वरूपाचे आंदोलन असल्याचे दिसून येते. शेतकरी आंदोलनामुळे आपल्या गरीब शेतकऱ्यांना त्याचा फायदा होतो. शेतकऱ्याच्या मालाला योग्य व रास्त भाव मिळवून देण्यास मदत होते. शेतकरी व सावकार यांच्यातील संघर्ष कमी करण्यास या आंदोलनाचा फायदा शेतकऱ्याला झालेला दिसून येतो.

शेतकरी आंदोलनामुळे शेतकरी वर्गात संघटन कौशल्य विकसितहोण्यास मदत झाली. शेतकरी वर्गाला विकासाचा मार्ग दाखवण्याचे कार्य आंदोलनातून मिळाले. शेतकरी आंदोलनामुळे आजचा तरूणवर्ग शेती व्यवसायाकडे वळण्यास मदत होते. आपल्या तरूणामध्ये शेतकऱ्याविषयी मान, सन्मान वाढताना दिसून येते. शेतकरीवर्गाला समाजात महत्वाचे प्रमुख स्थान मिळवून देण्यास मदत झाली म्हणता येईल. शेतकरी आंदोलनामुळे शेतकरी कामगारवर्गाला त्यांचे नुकसान सोसावे लागते. शेतकरी कामगाराला एक दिवस कामावर हजर नाही झाला तर त्याला उपाशी रहावे लागते. त्यामुळे शेतकरी आंदोलनामध्ये महिलाचा सहभाग हा कमी प्रमाणात दिसून येते. शेतकरी आंदोलनामुळे सरकारच्या शेतिविषयक धोरणात बदल करण्यास सरकारला भाग पाडते यांचे उत्तम उदाहरण म्हणजे शेतकऱ्याच्याबाबतचे तिन्ही कायदे माघारी घेणेहोय.

**सारांश :**

भारतातील ग्रामीण भागाच्या विकासाकरीता शेतीया विकास होणे गरजेचे आहे. भारत सरकार व राज्यसरकारकडून शेती विकास धोरण राबवणे गरजेचे आहे. शेतकऱ्याच्या अनेक समस्या प्रश्न यांचे निराकरण होणे गरजेचे आहे. अल्प सुधारक शेतकऱ्यासाठी शेतीविषयक अवजारे, खते, बी-बियाणे किटक नाशके यांची खरेदी करण्यासाठी कर्ज उपलब्ध करून दिले पाहिजे. शेतकरी आंदोलने यांची विचारधारा, प्रभावीपणे राबविणे गरजेचे आहे. शेतकरी आंदोलने यामध्ये काळानुसार बदल झालेला दिसून येतो. शेतकरी आंदोलनामध्ये शेतीविकास हाच घटक प्राधान्यक्रमाणे दिसून येते. शेतकरी आंदोलनाच्या माध्यमातून अनेक नवीन नेतृत्व उदयाला आलेले दिसतात.

**निष्कर्ष :**

1. स्वातंत्र्यपूर्वकाळातील शेतकरी आंदोलने हे असंघटीतपणे आंदोलने / लढे उभे करतात.
2. शेतकरी आंदोलनात एकात्मता / स्पष्टता दिसून येते.
3. शेतकरी आंदोलनातून नव-नवीन नेतृत्व उदयाला येताना दिसून येते.
4. विविध पिक उत्पादक शेतकऱ्याचे आंदोलनामुळे सरकारवर ती दबाव पडताना दिसून येते.
5. शेतकरी आंदोलनामुळे सरकारला शेतीविषयक धोरण राबवीण्यास भाग पडते.
6. शेतकरी आंदोलन हे न्यायाच्या तत्वावर आधारलेले आहे.
7. शेतकरी आंदोलनातून शेतकऱ्याला त्यांच्या उत्पादनाला योग्य भाव मिळवून देण्यास मदत होते.
8. शेतकरी आंदोलनामुळे शेतमजूराला फायदा होत नाही.

संदर्भसूची :

1. डॉ.बी. एम. कऱ्हाडे - सामाजिक चळवळीचे समाजशास्त्र, पींपळापुरे प्रकाशन नागपूर, प्रथम आवृत्ती जून 2011
2. रामगोपालसिंह सामाजिक न्याय एंव परिवर्तन, नॅशनल पब्लिकेशन हाऊस जयपूर 2006
3. शंकरराव खरात, सामाजिक चळवळीचा इतिहास, इंद्रायणी साहित्य शनिवार पेठ पुणे 2006
4. डॉ. एस. जी. देवगावकर, सामाजिक चळवळी परंपरागत आणि आधुनिक श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर. 2008
5. सुनिल तांबे - हिंदुत्वाच्या बुरख्याआड शेतकरी विरोधी चेहरा साधना प्रकाशन पुणे, जून 2007.
6. घनश्याम शहा भारतातील सामाजिक चळवळी, डायमंड पब्लिकेशन पुणे, प्रथम मराठी आवृत्ती 2008.
7. प्रा. म. ग. पेंडके सामाजिक विचारधारा, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर 1991.